admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

MCAER कृषि परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२५१८/2288

दि. 99ऑक्टोबर,२०१८

## परिपत्रक

विषयः- चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी. एससी. (ऑनर्स) कृषी व्यवसाय व्यवस्थापन व बी. एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हया पदवी अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेश कार्यक्रमाबाबत.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी. एससी. (ऑनर्स) कृषी व्यवसाय व्यवस्थापन व बी. एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हया पदवी अभ्यासक्रमाची सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया नियोजित वेळापत्रकानुसार दि. २२/८/२०१८ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे.

तथापि, इ. १२ वी (विज्ञान) ची पुरवणी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मधील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्रवेशाची संधी देणे, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या सामायिक प्रवेश परीक्षा दिलेले उमेदवारांना प्रवेशाची संधी देणे, व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत सध्या रिक्त असलेल्या जागा, कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत हस्तांतरित करण्याची महाविद्यालयांना संधी उपलब्ध करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन बी. एससी. (ऑनर्स) कृषी व्यवसाय व्यवस्थापन व बी. एससी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) या अभ्यासक्रमामध्ये विहित मुदतीत प्रवेश प्रक्रिया राबविण्यास या परिपत्रकाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

यासाठी सदर अभ्यासक्रमामध्ये खालीलप्रमाणे महाविद्यालयस्तरावर वाढीव प्रवेश कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | ११/१०/२०१८ |
| २ | ज्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयास संस्थास्तरीय रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी वर्ग करावयाच्या आहेत, त्यांनी लेखी स्वरूपात कृषी परिषद कार्यालयाकडे विनंती पत्र ई-मेलद्वारे edn mcaer@rediffmail.com या ई-मेल पत्त्यावर पाठविण्याचा कालावधी. | ११/१०/२०१८ ते १४/१०/२०१८ |

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| ३ | जे प्रवेशोच्छुक उमेदवार दि. २७/०७/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीमध्ये (सदरची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे) समाविष्ट नाहीत, अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज [रू.१०००/- शुल्कासह (आरक्षित प्रवर्गासाठी रू.५००/-) ] दाखल करण्याचा कालावधी. | १२/१०/२०१८ ते १५/१०/२०१८ |
| ४ | नव्याने प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांची यादीची संकेतस्थळावर प्रसिध्दी. | १६/१०/२०१८ |
| ५ | संस्थास्तरीय कोटयातून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकडे वर्ग केलेल्या जागांसह रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी. | १७/१०/२०१८ |
| ६ | रिक्त असलेल्या जागांकरिता महाविद्यालयस्तरावर **'जागेवर प्रवेश फेरी'**. | |
| | (अ) गुणवत्ता यादीमधील सर्व पात्र उमेदवार. | १९/१०/२०१८ |
| | (ब) गुणवत्ता यादीमधील सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रूपांतरासह) | २०/१०/२०१८ |
| ७ | संस्थास्तरीय कोटयातील रिक्त जागा संबंधित महाविद्यालयस्तरावर भरण्याचा अंतिम दिनांक | २२/१०/२०१८ **(सायंकाळी ५.०० पर्यंत)** |

**प्रवेश कार्यक्रमाबाबत महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. दि. २७/०७/२०१८ रोजी प्रसिध्द झालेल्या गुणवत्ता यादीमध्ये ज्या उमेदवारांची नावे आहेत, अशा उमेदवारांनी पुन्हा नव्याने अर्ज दाखल करू नयेत.

२. वरील अ.क्र.१ येथील उमेदवार वगळता पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मध्ये नमूद केलेली पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी, त्यांना योग्य तो प्रवर्ग, गुण, आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी, पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९ मध्ये नमूद केलेली मूळ कागदपत्रे उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. अशा कागदपत्रांची शहानिशा करूनच उमेदवारांनी ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये माहिती भरावी व संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत.

३. उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये भरलेल्या माहितीची तपासणी न करता उमेदवाराचा यादीमध्ये समावेश करण्यात येईल व जागेवरील प्रवेश फेरीचे वेळी संबंधित महाविद्यालयाकडून अशा मूळ कागदपत्रांची तपासणी करूनच प्रवेश निश्चित करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. संकेस्थळावर रिक्त जागांचा तपशील उपलब्ध असेल. अशा रिक्त जागा विचारात घेऊन उमेदवारास ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात उमेदवाराने मूळ कागदपत्रे, आवश्यक त्या शुल्कासह वर नमूद केलेल्या दिनांकास सकाळी ९.०० वाजता उपस्थित रहावे.

५. संवैधानिक आरक्षित जागांवर प्रवेशाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य असेल.

६. महाविद्यालयांनी प्रवेश देतेवेळी पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील जागेवरील प्रवेश फेरीविषयी 'परिशिष्ट के' मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबवावी.

७. या परिपत्रकाद्वारे सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, जादा वर्ग आयोजित करून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा.

८. वरील प्रवेश प्रक्रिया http://www.mcaer.org / maha-agriadmission.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

कौसडीकर.

(हरिहर कौसडीकर)
संचालक शिक्षण)

प्रत:-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांना सदर परिपत्रकाच्या संकेतस्थळावरील उपलब्धतेबाबत भ्रमणध्वनी संदेश पाठवावेत.

२. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरच्या परिपत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

३. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.